# प्रहार पर्व

PRAHAR PARV

संपादक : मयुर ज्ञानेश्वर काकडे

Editor : MAYUR DNYANESHWAR KAKADE

Email : mayurkakade554491@gmail.com

Mo.9673554491

* साप्ताहिक * मराठी * उस्मानाबाद (महा) * वर्ष ०१ * अंक १६ * सोमवार १८ नोव्हेंबर २०२४ * RNI No.MAHMAR/2023/89311 * पाने ४ * किंमत ₹ ५

* WEEKLY * MARATHI * OSMANABAD (MH) * YEAR 01 * ISSUE 16 * MONDAY, November 18, 2024 * RNI No.MAHMAR/2023/89311 * PAGE 4 * PRICE Rs.5

1


## रन फॉर व्होट रॅलीने दिले २० नोव्हेंबरला मतदान करण्यास प्रोत्साहन






धाराशिव (माध्यम कक्ष):- विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. जिल्हयातील सर्व चारही विधानसभा मतदारसंघात मतदारांमध्ये मतदानाविषयी जनजागृती होण्यासाठी आणि मोठ्या संख्येने मतदान करून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदान जागृतीचा एक भाग म्हणून आज १४ नोव्हेबर रोजी सकाळी ८ वाजता रन फॉर व्होट रॅलीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय येथून रॅलीचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांनी हिरवा झेंडा दाखवून केला.

या रॅलीमध्ये जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील,शिक्षणाधिकारी ( माध्यमिक) श्रीमती सुधा साळुंके,जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर,जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे व पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे हे सहभागी होते.

रन फॉर व्होट रॅलीत धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी हायस्कुल,श्रीपतराव भोसले हायस्कुल,जीवनराव गोरे विद्यालय, शरद पवार हायस्कुल,आर.पी.कॉलेज, व्यंकटेश महाजन कॉलेज,शासकीय नर्सिंग कॉलेज येथील ९५० विद्यार्थी-विद्यार्थ्यांनी, युवक-युवती व विविध शासकीय अधिकारी - कर्मचारी यांचा मतदान जनजागृती रॅलीत सहभाग होता.

या रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी कार्यालय येथे होऊन ही रॅली मध्यवर्ती प्रशासकीय इमारत राजमाता जिजाऊ चौक,संत गाडगेबाबा चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गाने मार्गक्रमण करत जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोहचून रन फॉर व्होट रॅलीचा समारोप करण्यात आला.

रॅलीत सहभागी पारंपरिक संबळ,ढोल व ताशा वाद्याच्या आवाजाने रॅलीत उत्साह निर्माण केला.शिक्षक श्री.पाटील यांच्या हसमुखराय या बोलक्या बाहुल्याने देखील मतदान करण्याचा संदेश दिला.

## आमचं पण ठरलं; तुळजापुर विधानसभा २०२४ मनसे आढावा बैठक संपन्न




धाराशिव- दि: १६/११/२०२४ रोजी तुऴजापुर येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना धाराशिव तालुका अध्यक्ष पाशाभाई शेख यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.यावेऴी मनसे युवा नेते निलेश कदम परमेश्वर, मनसे तुळजापूर तालुका सचिव धनाजी साठे , मनसे तालुका सचिव धाराशिव ७२ गाव , शिवानंद ढोरमारे , जेस्ट मनसैनिक मदन काळे , जेस्ट मनसैनिक झुंबर काळदाते, प्रशांत गरड , अमोल मोटे , राम माने , गजु वाघमारे ,लखन वाघमारे, विशाल नागरसे पाटील, सुशांत साबळे, कुमार कांबळे, अक्षय धनके , लक्ष्मण वाघमारे , समाधान मुळे , शुभम माले, नाना तांबे, हरी तांबे, अभिजित माने, अविनाश भोजने , राम ढगे , भैरू माने , शुभम हांडे , शंकर हुलगुंडे , नवनाथ चव्हाण , वैभव लोकरे , पृथ्वीराज चव्हाण , भिमाशंकर चव्हाण , अर्जुन चव्हाण , मनसे सोशल मीडिया अनिकेत शेख , आझाद शेख इत्यादी उपस्थित होते.

## अवैधरित्या गुटखा व पान मसाला वाहतुक करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

धाराशिव - मा. पोलीस अधीक्षक श्री.संजय जाधव, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. गौहर हसन यांचे मार्गदर्शनखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. कासार, पोलीस हावलदार शौकत पठाण,जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण चालक पोलीस अंमलदार तानाजी शिंदे असे विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने धाराशिव जिल्ह्यातील अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर कारवाई करणे कामी पेट्रोलिंग करत असताना जळकोट येथे आले असता पथकास गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, इनोव्हा कार क्र एमएच १५ बी. एच ८८८८ मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गोवा गुटखा विक्री करण्यासाठी वाहतुक करत आहे. सदर कार ही जळकोट ते किलज रोडवरुन जात आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन पथकाने नमुद ठिकाणी जावून दि. १५.११.२०२४ रोजी १२.४० वाजता नमुद कारचा पाटलाग करत सलगरा दि. येथे आले असता. सदर ठिकाणी काही इसम कार मधून पान मसाला, तंबाखु जर्दा, सुगंधीत, सुपारी पदार्थ तत्सम गुटखा घरात टाकत असताना मिळून आला त्यावर पथकाने त्यास ताब्यात घेवून त्यांची नावे विचारले असता त्यांनी त्यांची नावे-शिवराज विश्वनाथ बोकडे, वय ३९ वर्षे, रा.बेळंब ता. उमरगा जि. धाराशिव, दादासाहेब बब्रुवान शिगंटे, रा. सलगरा दि. ता. तुळजापूर जि. धाराशिव असे सागिंतले त्यावर पथकाने सदर ठिकाणाहून वाहन इनोव्हा कार क्र एमएच १५ बी. एच ८८८८ सह पान मसाला, तंबाखु जर्दा, सुगंधीत, सुपारी पदार्थ तत्सम गुटखा असा एकुण- १३,७४,४२० किंमतीचा माल मिळून आलेने जप्त करुन मिळून आलेला माल व आरोपी नामे-शिवराज विश्वनाथ बोकडे, वय ३९ वर्षे, रा.बेळंब ता. उमरगा जि. धाराशिव, दादासाहेब बब्रुवान शिगटे, रा. सलगरा दि. ता. तुळजापूर जि. धाराशिव यांना ताब्यात घेवून आरोपी यांचे विरुध्द पोलीस ठाणे नळदुर्ग येथे गुरनं ४४६/२०२४ भा.न्या. सं. कलम २२३,२७४,२७५, १२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उप निरीक्षक गिते हे करत आहे.

सदर कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय जाधव,अपर पोलीस अधीक्षक श्री. गौहर हसन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. वासुदेव मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. कासार, पोलीस हावलदार शौकत पठाण,जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण चालक पोलीस अंमलदार तानाजी शिंदे यांचे पथकाने केली आहे.

## विधानसभा निवडणुकीमुळे वाशी तालुक्यात महिला मजुरांना चांगले दिवस

वाशी : धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात सध्या विधानसभा निवडणूकीमुळे महिला मजुरांची चलती असल्याची चर्चा रंगताना दिसत आहे. सभा , रॅली यांना गर्दी करण्यासाठी मजुरांना त्यांची मजुरी दिली जात असल्याचे बोलले जात आहे. गावातील छोट्या सभांना देखील लोक जमत नसल्याने गर्दी करण्यासाठी मजुरांना जमा करण्याची वेळ राजकिय नेत्यांवर आल्याची ही चर्चा आहे.

नोव्हेंबर महिना म्हणजे थंडीचा महिना. या प्रमाणे सध्या थंडी सुरु झालेली आहे, वातावरणात सर्वत्र गारवा जाणवू लागलेला आहे. वातावरणात गारवा असला तरी निवडणूक प्रचाराने वातावरण गरम होत आहे. उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात आरोप प्रत्यारोपामुळे वातावरण तापू लागले आहे. निवडणूक प्रचाराने वेग घेतलेला आहे. प्रचाराच्या सर्व पद्धती अवलंबून आपले म्हणने मांडले जात आहे. निवडणूकीच्या निमित्ताने आपला प्रचार व्हावा, आपले विचार मतदारांपर्यंत पोहचावेत यासाठी राजकीय पक्षाकडून सभा, रॅली मेळावे, बैठका घेतल्या जातात. प्रचार करत असताना सभेला लोक असतील, गर्दी असेल तरच ती सभा परिणाम कारक ठरते नसता त्याचा उलटा परिणाम होऊन मतदान घटण्याची अधिक शक्यता असते. सभा, रॅली, बैठका यांना गर्दी व्हावी याकरिता वाशी तालुक्यात मजुरांचा वापर केला जात आहे अशी चर्चा उघडपणे होत आहे. मजुरामधे विशेषतः महिलांना याकरिता अधिक पसंती दिली जात आहे. तीनशे, चारशे, पाचशे रुपये रोजगार महिलांना दिला जात आहे. यामुळे सध्या महिला मजुरांची चलती आहे. शेतात खुरपणी नको ना ईतरत्र कुठे काम करणे नको, जीपमध्ये शानमधे बसणे, सभेला जाणे आणि घरी येणे यासाठी मजुरी दिली जात आहे. याशिवाय यांना चहा, नाश्ता व जेवण याची सोय केली जात आहे. यामुळे महिला मजुर तर ऐसा वक्त तो हमेशा आया करे अशी प्रार्थना करत आहेत.

सध्या राजकीय सभेला लोक जमत नाहीत याच्या अनेक कारणापैकी एक कारण म्हणजे राजकारणाचा घसरलेला स्तर हे आहे. लोक भाड्याने घेऊन जाण्याची पद्धत आत्ताच सुरू झाली आहे असे नव्हे तर पुर्वीही असे प्रकार घडत होते. पुर्वी मात्र असे प्रकार कमी होते आणि मोठ्या सभेच्या वेळी ते घडत होते. आता हे प्रकार सर्रास घडत आहेत. लहान चौकामधील सभेला जर भाड्याने लोक नेण्याची गरज पडत असेल तर लोकांमधे राजकारण्यां विषयी किती उदासीनता आली आहे याची कल्पना येते. पुर्वी लोकांना पक्षाच्या लोकानी फक्त वाहने जरी उपलब्ध करून दिली तरी लोक गाडीत बसून सभा ऐकण्यासाठी जात असत. आपला चालू कामधंदा सोडून, स्वतःच नुकसान करुन लोक सभेला जात असत. आपल्या गावामधे, शहरामधे सभा असेल तर लोक न बोलवता जमा होत असत. सभास्थानी लोक मोठी गर्दी करत असत. त्यावेळी लोकांमधे राजकारण्यां विषयी आस्था होती, तो राजकारणी आहे पण त्याच्या जवळ विचार आहे, तो समाजाच्या हिताच्या चार गोष्टी नक्की सांगणार, त्याच्या मनामधे जनते विषयी तळमळ आहे ही भावना लोकामधे होती. पुर्वीच्या राजकारण्यांमध्ये त्याग होता, आत्ताच्या राजकारण्यांमध्ये स्वार्थ भावना आहे. सकाळी एका पक्षात असेल तर संध्याकाळी त्या पक्षात असेल की नाही हे सांगणे कठीण झालेले आहे. निष्ठा, विचार यांचा ऱ्हास झालेला आहे. यामुळेच आज जनता सभेकडे पाठ फिरवत आहेत.

पुर्वी नेत्याच्या नावावर लोक जमा होत असत. आज अपवादात्मक नेते वगळता तसे नेते राहिले नाहीत. यामुळे भाड्याच्या लोकांची गरज पडत आहे. नेत्यांनी राजकारणाची गटार गंगा केलेली आहे आणि हे चित्र महाराष्ट्रासाठी एक विदारक चित्र आहे. हे चित्र बदलण्याची गरज आहे.


## बसवकल्याण येथे २३ व २४ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सवाचे आयोजन
### भालकी संस्थानचे डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांच्या दिव्य सान्निध्यात होणार दोन दिवसीय उत्सव



उमरगा : कर्नाटक राज्यातील बसवकल्याण येथे येत्या २३ व २४ नोव्हेंबर रोजी भालकी हिरेमठ संस्थानचे डॉ. बसवलिंग पट्टदेवरू यांच्या दिव्य सान्निध्यात दोन दिवसीय राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ व्या शतकात महात्मा बसवण्णा आणि ७७० शरणांनी अनुभव मंटपाची उभारणी केली. अनुभव मंटप हे जगातील पहिल्या लोकशाही संसदेचे प्रारूप मानले जाते. अनुभव मंटपात निर्माण झालेले वचन साहित्य मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करणारे आहे. समता, स्वातंत्र्य, कायक, दासोह, सदाचार आणि सकल जीवात्म्यांचे कल्याण ही मूल्ये अनुभव मंटपाने जगाला प्रदान केली. या मूल्यांचे पुनर्जागरण घडविण्यासाठी गत ४४ वर्षांपासून राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सवाचे आयोजन केले जाते. या उत्सवात कर्नाटक, महाराष्ट्र, तेलंगणा अशा अन्य राज्यांतील समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी होतात.

बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण येथे आयोजित राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सवाचे उद्घ्द्घटन शनिवारी (दि. २३) सकाळी ११ वाजता कर्नाटक राज्याचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मेघालयचे राज्यपाल सी. एच. विजयशंकर यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. के. एस. राजण्णा, उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती आणि लिंगायत स्वतंत्र धर्म अभ्यास समितीचे अध्यक्ष नागमोहन दास, महाराष्ट्र बसव परिषदेचे राज्य अध्यक्ष बी. एम. पाटील ( कोल्हापूर) आणि बसव टी. व्ही. चे संचालक ई. कृष्णप्पा या चौघांना अनुक्रमे डॉ. चन्नबसव पट्टदेवरू अनुभव मंटप, डॉ. एम. एम. कलबुर्गी साहित्य-संशोधन, बसव भास्कर आणि अनुभव मंटप असे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यातील डॉ. एम. एम. कलबुर्गी पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये रोख असे आहे. अन्य तिन्ही पुरस्कार हे सन्मानपत्र आणि एक लाख रुपये रोख असे आहेत. उद्घाटनानंतर दुपारच्या सत्रात 'लिंगायत आंदोलन पुढील दिशा' हा परिसंवाद होणार आहे. यावेळी न्यायमूर्ती नागमोहन दास यांचे व्याख्यान होणार



आहे. प्रा. आनंद कर्णे, विश्वाराध्य सत्यंपेटे यांची व्याख्याने आहेत. या परिसंवादात महाराष्ट्रात बसव विचार प्रसारांचे कार्य करणारे सचिन परब, वीरेंद्र मंगलगे, सचिन संगशेट्टी, प्रदीप बुरांडे, अभिषेक मिठारी, यश अंबोळे, सुदर्शन भुरे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

दुसऱ्या दिवशी रविवारी (दि. २४) सकाळी सामूहिक इष्टलिंग पूजा होणार आहे. त्यानंतर 'बसवकल्याण विकास काल, आज व उद्या' या परिसंवादात सिद्धप्पा मुलगे आणि प्रा. शिवशरण हुमणे यांची व्याख्याने होणार आहेत. यावेळी महाराष्ट्राचे क्रीडामंत्री संजय बनसोडे, रमेश अंबरखाने उपस्थित राहणार आहेत. दुपारी २ वाजता समारोप होणार आहे. यावेळी कर्नाटकचे उद्योगमंत्री डॉ. एम. बी. पाटील, सामाजिक न्यायमंत्री सतीश जारकीहोळी, वैद्यकीय मंत्री डॉ. शरणप्रकाश पाटील, मंत्री रहीम खान, ईश्वर खंडरे, बी. आर. पाटील उपस्थित राहणार आहेत.

## संपादकीय...

प्रहार पर्व

### सुजाण मतदारराजा

महाराष्ट्र राज्यात २० नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळात १५व्या विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणुका होत असून त्यासाठी ४१३६ उमेदवार रिंगणात आहेत. तेव्हा निवडणुकीत भाग घेणारे राजकीय पक्ष किंवा उमेदवार कशा प्रकारे एकमेकांचे वस्त्रहरण करीत आ-हेत हे सुजाण मतदार राजा पाहत आहे. १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी प्रचाराच्या तोफा थंड होतील. नंतर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन त्यांच्या कार्याची पोहोचपावती मिळेल. त्यासाठी प्रत्येक उमेदवार शक्तिप्रदर्शन व आश्वासनांची खैरात करीत आहेत. तसेच गुप्त भेटी सुद्धा अधूनमधून घेतल्या जात आ-हेत. म्हणजे मतदार राजाने २३ नोव्हेंबरनंतर पश्चा-ताप करून घेण्यापेक्षा आताच मतदार राजाने जागृत राहाणे गरजेचे आहे. तरच मतदानाच्या दिवशी मतदार राजा आपल्या अमुल्य मतदानाने आपल्या हक्काचा प्रतिनिधी विधानसभेत पाठवू शकतात. आपल्या राज्यात विधानसभेचे कामकाज मुंबईतील मंत्रालयात चालते. त्यासाठी मतदार राजानी आपल्या मतदारसंघाचे वैभव करणाऱ्या उमेदवाराला मतदान केले पाहिजे. सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नव्हते. त्यात कोविडचा काळ, त्यानंतर राजकीय घडामोडीत विधानसभेचे कामकाज चालले. यात विकासापेक्षा अंतर्गत घडामोडीत अडीज वर्षे केव्हा गेली ही समजली सुद्धा नाही. यात सुशिक्षित बेकार वर्ग सोडा शासकीय सेवकांना सुद्धा आपल्या हक्कांसाठी लाक्षणिक संप करण्याची वेळ आली होती. मात्र निवृत्ती वेतनाचा मार्ग अजून सुटलेला नाही. आपल्या महाराष्ट्र राज्यात पहिली विधानसभेची निवडणूक १९६० साली झाली. त्यानंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्याच्या राजकीय वाटचालीला सुरुवात झाली. २०२४ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीचा विचार करता, आपल्या राज्यातील प्रत्येक उमेदवारांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली आहे. त्यामुळे मतदार राजाने जागृत राहिले पाहिजे. ते सुद्धा राजकीय उमेदवारांच्या प्रतिष्ठेसाठी नव्हे तर देशातील लोकशाही मजबूत होण्यासाठी मतदान केले पाहिजे. महाराष्ट्र राज्यात तृतीयपंथी मतदार ६१०१ महिला मतदार चार कोटी एकोणसत्तर २,९६,२७९ पुरुष मतदार तर पाच कोटी बावीस हजार सातशे एकोणचाळीस असे एकूण मतदार नऊ कोटी सत्तर लाख पंचवीस हजार एकशे एकोणीस आहेत. तेव्हा सुजाण राज्यातील मतदार राजाने मतदानाच्या दिवशी मतदार केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. कारण मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. राज्याच्या विकासासाठी राज्यातील प्रत्येक मतदार राजाने मतदान करायला हवे. तेव्हा महाराष्ट्र राज्यातील तरुण असो अथवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाचे मत सोन्याहून अधिक समृद्ध आहे हे मतदार राजाने लक्षात ठेवले पाहिजे. आज विधानसभेच्या रिंगणात असणारे भावी लोकप्रतिनिधी कशा प्रकारे विकासाचे मॉडेल प्रचार सभेत मांडत आहेत याची चांगली कल्पना मतदार राजाला आहे. तेव्हा आपल्या विभागाचा सर्वांगीण विकास करणारा व आपल्या विचारांशी प्रामाणिक असणारा नेता निवडा. असाच नेता आपल्या मतदार संघाचा विकास घडवून आणू शकतो. असे झाले तरच आपोआप राज्याचा विकास होण्याला वेळ ला-गणार नाही. तेव्हा अशा प्रामाणिक उमेदवाराला मतदान करा तरच खऱ्या अर्थाने आपल्या देशा-तील लोकशाही अधिक बळकट होईल. केवळ राजकीय पक्षाचा जाहीरनामा किंवा उमेदवारांच्या आश्वासनांना बळी पडू नका. त्यासाठी मतदार राजाने आजचा नाही तर उद्याचा विचार करावा. यातच जनतेचे हित आहे.

# तुरीच्या शेंगा आणि शर्यत

पिवळं (पिवळी ज्वारी) काढायचं म्हणून वैजाबा साऱ्या गावात फिरला.कुणीच मिळणा गेलं. ह्याला ईचार त्याला इचार. पर छा....माणूसच मिळणा. मिळल त्येला ये नाना!!! येताव का? ताई येताव का.पर कुणीच व्हय म्हणीना. जे ते न्हाईच म्हणीत.मग काय कटाळून आडसूळ्याच्या गल्लीतून वरच्या चौकात आला. भोगजी गाव तसं एकदम बारकं. दोन-तीन गल्ल्या सोडल्या की गाव संपायचं.

आडसुळ गल्ली, खराटेची गल्ली सोडली तर बाकी मग इतर गल्या बारीक सारिकाच.

वाघमाऱ्याच्या दारातून पुढे सरकत धसाच्या घरा म्होरं ईऊन हाक मारली ये शांताबायेऽऽ. कोणय म्हणून मधुकर दारात आला. उजव्या हात वर करून राम राम आबा म्हंला.तवर शांताबाई भाईर आली. वैजाबाला बघून शांताबाई म्हणली. हाक मारली व्हय? व्हय. काय काम होतं? पिवळ काढायच व्हतं. येताव का? येते पर एका आटीवर. वैजाबा म्हंला कसली? मला गड्याची पगार द्यावी लागेल. तरच मी येते. नाहीतर येणार नाही. वैजाबानी डोळे वटारले. त्याला कळना बाई काय म्हणते ते....मग म्हंला गड्याची पगार?? व्हय गड्याचीच. तू काय गड्या हित्क काम करणार हाय व्हय ? व्हय करीन की, गड्या हित्क काम केलं तरच पगार मागिन, नाहीतर न्हाई मागायची. चार गडी सोबत लाव. त्याचे हित्क काम येळेवर न्हाई केलं तर मी पगारच मागणार न्हाई. आत्मविश्वासाने बाई वैजाबाला बोलली.

वैजाबानं आवाक हूऊन बाईकड बघितलं. अन् लगेच म्हंला, हो देतो. पर काम जर न्हाई झालं तर मोकळ्या हातानी घरला यावं लागल. बायाचीबी मजुरी देनार न्हाई.बाई लगेच व्हय म्हणली. लागली शरत. बघू कोण हारतय ती.

बाईचा मुलगा मधुकर दोघांच्या तोंडाकडे बघत शांत उभा व्हता. मग बाईला म्हणला ये बायेऽऽ. शरत कशाला करती. नकु लाऊ. ये आबा राहू द्या वं. तेल बी जाईल. आन तूप बी. आर मला ठाऊक हाय.गड्या हित्क काम करीन मी. आन न्हाई करून दाखवलं तरच बाईला शांताबाई म्हनू नका.

तोंडाला काळ लाऊन गा-वात फिरीन. बाईचा आत्मविश्वास वाढला होता. वीरश्री अंगात संचारली होती. काम करण्याची हिम्मत होती. अंगात ताकद होती. म्हणूनच बाई बोलत होती. मग ठरलं. टोकणीच्या म्होरच्या आवडात पिवळ काढायचय तित जा. असं वैजाबा बोलला. आन घरी निघून गेला. मनाची तयारी करून मळकुटलेल्या धडपात भाकर आन हिरव्या मिरच-ीचा ठेचा बांधून घेतला. त्याच धडपच्या बांधलेल्या गाठी मदी इळा हिलगावला. टूकलणीच्या दिशेने झपाझप पावलं टाकीत बिना पायथानाचं बाई निघ-ाली. गडी, बाया यायच्या आत शांताबाईनं शेत गाठलं. धरलेली पात कडेपर्यंत घेऊन गेली. तवा मुसलमानाचा आबान्या, कारभारी खराटच्याचा मधुकर, सुनंदा खराटीन अडसूळाची कमलबाई , तुकाराम खराटे,असे दोन गडी, दोन चार बाया बोलत बोलत त्यांनी शेत गाटलं.आन बघतो तर काय शांताबाईनं एक पात लाऊन लेकरं सांचाला शेंगा शिजवून खात्याल म्हणून. हिरव्या हिरव्या तुरीच्या शेंगा पट्यात उभा राहून तूडीत व्हती. कमलताईंनं लांबूनच डोक्यावर ठेवलेल्या भाकरीला हात लावत तोंडावर हात ठीवला. आन म्हणली.बाबोव ऽऽ शांताबाई का भूत हाय का कायऽऽ .? एक पात लावूनच बसली की मायऽऽ. समद्यांनी तर तोंडात बोटच घा-तली. मग काय, काम सुरू झालं. ईळे झपाझप चालत व्हते. वावर आडव होत व्हतं. शांताबाई गड्याच्या बरोबरीनं पातीवर पाती लावीत व्हती. गड्यांना मागे टाकीत व्हती. गड्यानिबी तिला हरवायच म्हणून चंग बांधला. पर शांताबाई हारली नाही. शांताबाईची पात पुढच असायची.

लेखक
भूमिपुत्र वाघ

दुपारच्या टायमाला जेवताना फक्त शांताबाईच कौतुक चालू होतं. जसा येळ मिळेल तसं भाकरीच्या धडपात चांगली दोन-तीन पाळी शांताबाईनं शेंगा तूडून ठीवल्या.

दिवस मावळतीला आला. तव्हा वैजाबा शेताकड झपाझपा पावलं टाकीत आला. बघतो तर काय शांताबाईनं समद्यात जास्त दोन पाती लावलेल्या. गड्या बायांना शांताबाईनं तवाच हार्विलं व्हतं. दोन पाती जास्तीच्या बगुन वैजाबा बोलला. बायेऽऽऽ तुझा वंजारी समाजाला अभिमान वाटावा. एवढं काम करतेस. तू मातर मला हारवीलस.वा बाई वा. वैजाबा बोलत बोलत खाली बसला. गाडग्यातलं पाणी झाकणीनं पेत खिशातला पैशाचा बंडेल भाईर काढला. त्यातली पाच रुपयाची नोट हातात घीतली. आन समदया देकत बाईच्या हातावर टिकविली. पैशाकडे बघून बाई पाया पडली. आन म्हणली!!!! आज पसून मी गड्याचीच पगार घीईन. गड्याचं काम करीन.समदे तिच्याकडे बघत व्हते.

तडपात बांधलेल्या तुरीच्या शेंगा घीऊन बाई गावची वाट चालती झाली. घरी आली शेंगाचं गटूड बाजूला ठेवलं.हात पाय धुतलं. आन चुल पिटविली. चुलीवर पातेलं ठिऊन पाणी मीठ टाकून शेंगा टाकल्या. शेंगा शिजतील तसं शेंगाचा वास घुमायला लागला. मधुकर भाईरून आला.तेणं पातेलं बघितलं. बाईला म्हंनला, काय शिजतय ग बाये पातेल्यात. तुरीच्या शेंगा हाईत. बघ बर शिजल्या का? बाई म्हणली.मधुकरणी पात्याल्यावरचं झाकण उघडलं. मीट मिसळून शिजायला टाकलेल्या शेंगा गदा गदा उकडत होत्या. शेंगाचा वास घमघम येत व्हता. इतक्यात बाई म्हणली!!! आर् आणाला बोलिव की, समदीच बसून शेंगा खावा. मधुकरनी मला हाक मारली. हे भुम्या ीीी.आर ये घरी.तसा मी शेजारच्या वाड्यात राहत व्हतो. तुराट्याचा कुड लावून शेजारच्या माणसाने माझ्या राहण्याची सोय केलेली. मधुकरनी दिलेला आव-ाज मी ऐकला.मग मी लगेच त्यांचे घरी गेलो. शिजलेल्या शेंगा बघून तोंडाला पाणी सुटलं.मग काय ीीी .मी, मधुकर, आशा, सुहास एका ताटात समदी भावंड शेंगा खायला लागलो. खरंतर त्यांच्या जातीचा,ना धर्माचा मी कोणीच नव्हतो. परंतु मधुकरच्या आईने (बाईनं) मला चौथा लेक मान-लेला. आणि आमचे गुरु म्हणजे विश्वनाथ (आणा) तोडकर यांना पाचवा. गप्पागोष्टी व्हायच्या तेव्हा बाई रुबाबानं म्हणायची मला पाच पांडव हायेत. खरंतर ती माया, प्रेम, जिव्हाळा आस-नारी माणसं हजारो गाव फिरलो, पण तेवढी माया देणारी माणसं कुठेच भेटली नाहीत....न बोलता सगळेजण शर्यतच लावावी जणू अशा पद्धतीने भावंडे येका ताटामध्ये शेंगा खात राहिलो..... शेंगाची चव आजूनही आठवत राहते.

## तुमच्या शत्रूचे हृदय जिंका

एका यशस्वी व्यापाऱ्याचं अतिशय सुसज्ज असं किराणा दुकान होतं. त्याचा व्यवसायही चांगला भरभराटीला आलेला असा होता. अर्थात् अनेक गिऱ्हाईक आपल्याकडेच अगदी विश्वासाने येतात आणि त्यांच्या दैनंदिन गरजा आपल्याकडेच खरेदी करून भागवतात. या विचाराने तो आनंदी होता. त्याच्याच दुकानासमोर एक मोठे आणि सुसज्ज डिपार्टमेंटल स्टोअर बांधले जात आहे, ही गोष्ट मात्र त्याच्यासाठी फार धक्कादायक आणि निराश करणारी अशी होती. त्या व्यापाऱ्याला असे वाटत होतं की हे नवीन दुकान आता आपला धंदा बंद करणार. त्रस्त होऊन तो त्याच्या गुरुकडे गेला आणि त्याला त्याने सांगितलं की हे दुकान जवळपास शतकापासून त्याचं पिढीजात आहे. ते गमावणं म्हणजे त्याच्यासाठी फारच नुकसान करणारं आहे, कारण त्याच्याजवळ दुसरा कुठला व्यवसाय करण्याचे कौशल्यही नाहीये. गुरू म्हणाले, जर तू त्या नव्या दुकानाच्या मालकाला घाबरत असशील, तर तू त्याचा तिरस्कार करशील आणि हा तिरस्कार म्हणजे तुझी अधोगती आहे, असं समज.

मग मी काय करू? त्या भ्रमिष्ट व्यापाराने विचारले.

रोज सकाळी दुकानाच्या बाहेर येऊन रस्त्यावर उभा राहात जा आणि तुझ्या दुकानाला चांगले आशीर्वाद दे, त्याच्या भरभराटीची इच्छा कर. मग तुझ्या समोरच्या त्या नव्या दुकानाकडे बघ आणि त्यालासुद्धा तसेच आशीर्वाद दे

काय? माझ्या स्पर्धकाला आणि माझा सर्वनाश करणाऱ्याला । आशीर्वाद...?

तू त्याला जे चांगले आशीर्वाद देशील तेच तुझ्याकडे परतून येतील, तू त्याच्यासाठी ज्या संकटाची इच्छा करशील ते संकट तुझाच विनाश करेल. एका वर्षानंतर तो व्यापारी गुरुला सांगण्यासाठी आला की त्याला ते दुकान बंद करावं लागलं आहे. कारण तो आता त्या डिपार्टमेंटल स्टोअर्सचा मालक झाल्याने त्याला छोटं किराणा दुकान बंद करून टाकावं लागलं. आपण एकटे कधीही जगू शकत नाही. कारण विश्वातील प्रत्येक घटक हा दुसऱ्याशी सूत्राने बांधलेलाच असतो. हे एक वैज्ञानिक असं सत्य आहे. आपल्या विचारामध्ये विभिन्न पातळ्यांमध्ये फिरण्याची क्षमता असते. आपल्या अनुभवाला येणारी किंवा आपण मनात बाळगलेली प्रत्येक भावना समग्र विश्वाला व्यापून टाकते. एखाद्या व्यक्तीविषयी आपण बाळगलेली चांगली भावना ही त्याच्यापर्यंत अजाणतेपणीही पोहचतेच. प्रत्येक व्यक्ती इतरांच्या चांगल्या वा वाईट भावना (कोणत्या का मार्गाने होईना, पण) समजून घेऊ शकतो. जाणतेपणी वा अजाणतेपणी आपल्या आयुष्यभर हे अपरिहार्य असे घटित घडतच असते. जेव्हापासून त्या किराणा व्यापाऱ्याने त्या डिपार्टमेंटल स्टोअरच्या मालकाचा तिरस्कार करणे सोडले आणि एवढच काय पण त्याला आशीर्वादही दिले, ते दोघे मित्र बनले आणि तो किराणा व्यापारी त्या डिपार्टमेंटल स्टोअरचा भागीदारही बनला. त्या किराणा दुकानदाराचा अनुभव अर्थात् बराच असल्यामुळे तो अतिशय सक्षमतेने ते स्टोअरही चालवू शकला. सरतेशेवटी, त्या मालकाने त्या डिपार्टमेंटल स्टोअरचे सारे अधिकार त्या किराणा दुकानदाराकडे देऊन टाकले आणि तो स्वत:चं भलं व्हावं म्हणून शहर सोडून दुसरीकडे गेला.

# नाचून गेल्या चिमण्या

सकाळी अंगणातल्या चिवचिवाटानं जाग आली. चिमण्यांचा थवा अंगणात गलका करत होता. चटचट चटचट किड्या मुंग्या वेचण्यात सगळ्या गुंग होत्या. आईनं शेणानं सारवलेल्या अंगणाला नुकताच लखलखीतपणा आला होता. त्या शेणातल्या किड्या अळ्या आणि धान्य वेचण्यात रममाण झालेल्या चिमण्या माझी चाहूल लागताच भुर्रकन उडून लिंबांच्या झाडावर जाऊन बसल्या आणि अंदाज घेऊन काही क्षणात पुन्हा सारवलेल्या अंगणभर पसरल्या. चिमणा चिमणीचे ते चिवचिव करत, चटचट अन्न वेचत आणि टुणटुण उड्या मारत अंगणभर हुंदडणं डोळ्यात साठवत मी बाजूला बसून पहात होतो. काही अगदी माझ्या जवळ येऊन मला निरखून पहात होत्या. मीही कुतुहलानं त्यांच्या डोळ्यात एकटक पाहत त्यांचं निरागसपण टिपून घेत होतो.

आपल्याच तालात नाचणाऱ्या चिमण्यांनी अंगण सजून गेलं होतं. मध्येच शेळ्यामेंढ्यांचं ओरडणं, गाईगुरांचं हंबरणं आणि कावळ्यांचं कारकारनं ऐकत.. एकटक त्या अंगणाचं जिवंतपण अनुभवत होतो. बाजूला आईनं पाणी भरून ठेवलेली दगडी काटवटीत चिमण्यांची अंघोळीसाठीची धडपड आणि उडणारं पाणी कोवळ्या उन्हात अंगणाला सोनेरी झालर लावून जात होतं. तिथंच टपून बसलेली मनी आणि चिमण्यांचं हुंदडणं पहात दोन्ही पायावर तोंड ठेवून शांतपणे पहुडलेला काल्या होता. मध्येच अंड्याला आलेल्या करड्या कोंबडीचं देवळीत उडी मारण्यासाठी चाललेली धडपड आणि फांदीवर लक्ष ठेवून टपलेले कावळे सारे काही माझ्या बनपुरीच्या घराच्या अंगणाची शोभा वाढवत होते.

नुक्त्याच चार पाच दिवसापूर्वी जन्मलेल्या शेळ्यांच्या करड्यांनी अंगणभर उड्या मारत चालवलेला धिंगाणा आणि सारवलेल्या अंगणात बारीक बारीक पडलेल्या लेंड्यांचा अंगणभर सडा पसरलेला होता. अंगणातल्या चुलीवर काळ्याकुट्ट अंगानं डिचकीत पाणी तापत होतं. दुसऱ्या बाजूला काट्याकुट्यात भक्ष शोधणारी पंडी मांजरीन तिच्याच तालात होती. पाणी तापवत डोळं चोळत, फुकणीनं फुकत शेकत गप्पा हाणीत बसलेली पोरं. असं गावाकडचं घरदार भरलं की अंगणात नाचणाऱ्या चिमण्यांनी रोजच्या सकाळचं अंगण असं उजळून निघतं...

आज चिमण्यांचं चिवचिवणं क्वचितच ऐकायला मिळतं. लहानपणी माळवदी घराच्या किलचानात चिमण्या घरटं करायच्या. घरटं बनवताना त्यांची चाललेली धांदल सारं घर उघड्या डोळ्यानं बघायचं. कधी कधी घरात पसरलेला कचरा, त्यातच पडलेलं एखादं फुटलेलं अंडं आणि कधीतरी उघड्या अंगाचं पडलेलं चिमणीचं पिल्लू पाहून मन हळहळायचं. चिमण्यांचं सुख आणि दुःख अनुभवत बालपण कधी सरलं समजलंच नाही. चिमण्यांनी मात्र घरात आणि मनात केलेलं घरपण हटता हटलं नाही.

आज मात्र अंगणात नाचणाऱ्या चिमण्यांनी मनाचं अंगण पुन्हा हरखून गेलं... अशा अंगणभर पसरलेल्या चिमण्या पुन्हा पुन्हा मनात नाचत रहाव्यात.. आणि घराचं अंगण पुन्हा सजीव होत रहावं..! (आज अंगण हरवलेली घरं आणि चिमण्यांचं ओसाडपण मनाची घालमेल वाढवत राहते अगदी माझ्या आणि तुमच्याही.)

## केंद्राप्रमाणे राज्यातही आपल्या हक्काचे महायुती सरकार येणार

### युवा नेते मल्हार पाटील यांच्या विविध गावात कॉर्नर बैठका



धाराशिव - केंद्रात ज्याप्रमाणे देशाला अपेक्षित असे हक्काचे सरकार आले. अगदी त्याचप्रमाणे राज्यातही महायुतीचे सरकार सत्त-ेवर आले तर आपल्याला विकासासाठी निधी कमी पडणार नाही. त्यामुळे मतदारांनी महायुतीच्या उमेदवारालाच साथ द्यावी, महाराष्ट्राचा विनाश करू पाहणार्या मविआला त्यांची जागा दाखवून द्या, असे आ-वाहन युवा नेते मल्हार पाटील यांनी केले.

तुळजापूर विधानसभा महायुतीचे उमेदवार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ धाराशिव तालुक्यातील नितळी, सुंभा, येवती येथे सभा, कॉर्नर बैठका घेऊन मल्हार पाटील यांनी मतदारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आतापर्यंत तुम्ही मोलाची साथ दिली. भविष्यातही असेच मजबूत पाठबळ मिळणे गरजे-चे आहे. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून गेल्या अडीच वर्षात जिल्ह्यातील अनेक महत्वाचे प्रकल्प मार्गी लागले आ-हेत. हे प्रकल्प पूर्ण करून घेण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज आहे. केंद्रात आपल्या हक्काचे सरकार आहे. राज्यात देखील महायुतीचे सरकार पुन्हा येणार आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारकडून जिल्ह्याच्या विकासासाठी निधी खेचून आणण्यासाठी दादांची राजकीय ताकत वाढवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. विकासाचा हा ओघ कायम राहावा व आपल्या गावातही भरघोस विकास निधी आणता यावा, यासाठी महायुतीच्या कमळ या चिन्हाला मतदान करावे, असे आवाहन मल्हार पाटील यांनी केले.

This Letter, owner, publisher, editor Mayur Dnyaneswar Kakade Printed by Mayur Offset Printers, Ramkrishna Colony, Umbare Kota, Tq.&Dist Osmanabad and Published at Ramkrishna Colony, Umbare Kota, Tq. & Dist. Osmanabad 413501 (MH) Mo.9673554491

हे पत्रक मालक, प्रकाशक व संपादक मयुर ज्ञानेश्वर काकडे यांनी मयुर ऑफसेट प्रिंटर्स रामकृष्ण कॉलनी, उंबरे कोटा, ता.व जि.उस्मानाबाद येथे छापून कार्यालय : रामकृष्ण कॉलनी, उंबरे कोटा, ता. व जि.उस्मानाबाद -४१३६०५ (महा.) येथे प्रकाशित केले. मो.९६७३५५४४९१

# आमदारकी चुली विझविण्यासाठी नसते,चुली पेटविण्यासाठी असते; माणकेश्वरातील जाहीर सभेतून प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी डागली राहुल मोटेवर तोफ



परंडा - गोरगरिबांची व शेतकर्यांची सेवा करणं हे आमदाराचे काम असते, आपले आमदार पद घराघरात, जातीजातीत भांडणं लावण्या साठी नसतं.आमदार हा दुसर्याच्या चुली विझविण्यासाठी नसतो तर चुली पेटविण्यासाठी असतो,अशा शब्दांत राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रा. डॉ.तानाजीराव सावंत यांनी माजी आमदार राहुल मोटे यांच्यावर माणकेश्वर येथील जाहीर सभेतून दि.१५ नोव्हेंबर रोजी रात्री टीकास्त्र डागले.

याने १५वर्षे मतदारसंघाची नुसती वाट लावण्याचे काम केले. दूध संघ,महानंद,शिखर बँक, डीसीसी बँक या सर्वांवर याला संधी मिळाली तर तेथेही याने वाट लावली.याने जेथे पाय ठेवला तिथे वाट लागली,अशी जोरदार शाब्दिक टोलेबाजीही प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी यावेळी केली.

माणकेश्वर व वांगी येथे काल महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या घणाघाती सभा झाल्या.मतदारसंघातील महिला, पुरूषांसह तरूणवर्गाची या दोन्हीही सभांना जोरदार गर्दी होती.आपल्या घणाघाती भाषणांत प्रा.डॉ.तानाजीराव सावंत म्हणाले,की माणकेश्वरची शिव ओलांडून आलो तेव्हा स्व. बापूसाहेब अंधारे यांची आठवण आली,आजही त्यांच्यासोबत चालतोय असंच वाटलं. बापूसाहेब व माणकेश्वर माझ्या हृदयात आहे.जोपर्यंत जीवंत आहे,तोपर्यंत त्यांच्या कुटुंबाला व माणकेश्वर गावाला विसरणार नाही.बापूसाहेबांना जेव्हा मी जिल्हा परिषद लढवावी लागते असे सांगितले तेव्हा ते म्हणाले होते,की मला कोण मतं देणार! त्यावर मी म्हणालो होतो, की संपूर्ण माणकेश्वर गाव तुमच्या पाठीशी आहे.आणि ते जिल्हा परिषदेत मोठ्या मतांनी विजयी झाले.दुर्दैव असं की,कोरोना काळात ते आपल्याला सोडून गेले,असे सांगून प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी स्व. बापूसाहेब अंधारे यांच्या स्मृतींना उजाळा दिला,तेव्हा अनेकांचे डोळे पाणावले होते.मी येथे विकासाची चर्चा करायला आलो आहे,आम्ही सामाजिक कार्य करतो.आजपर्यंत घेतलेल्या लग्न सोहळ्यांत गोरगरिबांच्या घरच्या सहा हजार जोडप्यांची लग्ने लावली आहेत,त्याचबरोबर त्यांना रोजगारही दिला आहे. केवळ सामाजिक बांधिलकी जपत,आमदार नसतानाही मतदारसंघातील शेतकर्यांसाठी 'शिवजलक्रांती'च्या माध्यमातून नदी,नाले खोलीकरण करून जलसाठे,भूजलसाठे वाढविले. त्यामुळे वाढलेल्या पाणी पातळीचा आज सर्व शेतकर्यांना फायदा होत आहे.मागील निवडणुकीत पाणी आणण्याचा शब्द दिला होता.तो पाळला असून,सीना कोळगावच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे.येत्या गुढी पाडव्याला 'उजनी'चे पाणी आपल्या मतदारसंघात येत आहे. आता हा माजी आमदार म्हणतो, 'यानं काय केलं'? प्रत्यक्षात जाऊन बघ मी काय कामं केली आहेत! यानं १५ वर्षे आमदार असताना कुठलाही विकास केला नाही. दूध संघ, महानंद,शिखर बँक, डीसीसी बँक यामध्ये याला 'काका'नं संधी दिली,याला लाल दिव्यातून कधी खाली येऊ दिलं नाही,आणि ह्याने काय केलं तर जेथे पाय ठेवला तेथे वाट लावली.याने वाट लावण्याशिवाय दुसरं काहीच केलं नाही,अशी जोरदार टीकाही प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी राहुल मोटे यांच्यावर याप्रसंगी केली. पुढील पाच वर्षे या भागाचा राहिलेला विकास करण्यासाठी निवडून द्या, नुसता निवडूनच नाही तर लाखोंच्या मताधिक्क्याने निवडून द्या,असे आवाहनही याप्रसंगी प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला केले.

याप्रसंगी रिपाइंचे नेते संजयकुमार बनसोडे, सुभाषसिंह सद्दीवाल,शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अर्चनाताई दराडे यांचीही घणाघाती भाषणे झालीत.यासह सर्व नेत्यांनी आपल्या भाषणातून विरोधकांचे अक्षरशः वाभाडे काढले.

अर्चनाताई दराडे म्हणाल्या, की शेतकर्याचा मुलगा आरोग्यमंत्री झाला म्हणून त्यांनी शेतकरी,महिलांच्या हिताचे निर्णय घेतले.माजी आमदार राहुल मोटे व त्याच्या पत्नीने फक्त लोकांना टोप्या घालायचे काम केले.बचत गट आम्ही सुरू केले म्हणणार्यांनी २०१५ पासून ते २०२४ पर्यंत एका तरी बचत गटाला कधी आर्थिक मदत केली का? आमचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत यांनी हजारो भावांना केलेली मदत,बचत गटांना केलेली मदत,मी मोटे व त्यांच्या पत्नीला दाखवून देते, असे टीकास्त्रही यावेळी अर्चनाताई दराडे यांनी डागले.

तर वांगी येथील सभेत बोलताना प्रा.डॉ.तानाजीराव सावंत म्हणाले,की आमची शिवसेना ही बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष आहे. हा पक्ष विस्थापीत,गरिबांचा आहे. गोरगरिबांसाठी रस्त्यावर उतरण्याचं आम्हाला बाळासाहेबांनी शिकवलं आहे. माझ्या कार्यकर्त्याला कुणी त्रास दिला तर मी स्वस्थ बसणार नाही,आणि जर कुणी गावाच्या विकासात आडकाठी घालत असेल तर त्याला सोडणारदेखील नाही,असा इशाराही त्यांनी यावेळी संवाद दौरा बैठकीतून दिला.मी वारकरी आहे, देवधर्म मानतो.जे या गावात देव आहेत,ते माझ्या घरात आहेत.मी अध्यात्मिक माणूस आहे,त्यामुळे कुणाची फसवणूक कधी माझ्याकडनं होणार नाही.'बाणगंगे'ची फाईल माझ्याकडे तयार आहे,माजी आमदाराने 'बाणगंगे'वर युवकांना कामाचं आश्वासन दिलं होतं, पण ते पूर्ण केलं नाही.शेतकर्यांनाही फसवलं,असे आमचे भूम तालुका शिवसेनाप्रमुख व वांगी गावाचे बालाजी गुंजाळ यांनी सांगितलं आहे.'बाणगंगे'चं काय घेऊन बसला बालाजी; तुझ्याकडे चार कारखाने आहेत, आपण नोकर्या देऊ,असे सांगून माजी आमदाराकडून फसवणूक झालेल्या शेतकरीपुत्रांना दिलासा देण्याचं कामही तानाजीराव सावंत यांनी केले.आपआप सातले मतभेद विसरून विकासासाठी एकत्र या,व या भागाच्या विकासाची गंगा वाहती ठेवण्यासाठी किमान एक लाखाच्या लीडने विधानसभेत पाठवा,असे आवाहनही प्रा. डॉ. सावंत यांनी याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला केले.

या सभांना शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अर्चनाताई दराडे,शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी गुंजाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनाथ जगताप,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब हाडोंग्रीकर, माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्धीवाल,रिपाइंचे नेते संजयकुमार बनसोडे,महादेव अंधारे,भाजपचे तालुका अध्यक्ष महादेव वाडेकर,भाजपचे तालुका उपप्रमुख रामराजे गोरे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष रामराजे साळुंखे,युवा उघोजक साहील गाढवे,भूम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नीलेश शेळवणे,समाधान सातव,विशाल ढगे,युवराज तांबे,सरपंच शशिकांत गुंजाळ,आबा जाधवर, श्यामल कोळेकर,पिंटू टकले, उमेश गोरे,अधिकराव काकडे, भाऊसाहेब अंधारे,उपसरपंच माणकेश्वर विशाल अंधारे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष सुदाम पाटील, शेरमोहम्मद मुकेबिल,हाबुलाल मणियार आदींसह मोठ्या संख्येने महिला, पुरूष व तरूणवर्गासह कार्यकर्ते, पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# विधिमंडळात जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी विजयी करा - प्रवीण स्वामी
## धाकटीवाडी, जगदाळवाडी व तलमोड येथील नागरीकांशी संवाद

उमरगा : सध्याच्या आमदारांनी ज्या उध्दव ठाकरे यांनी तीन वेळा आमदार केले तरी त्यांना धोका दिला. गेल्या अडीच वर्षात १८०० कोटी रु. चा निधी मतदार संघासाठी आणला असे सांगतात मात्र हा निधी गेला कुठं. तालुक्यापेक्षा ठराविक गुत्तेदारांचाच विकास झाला आहे. त्यामुळे उमरगा - लोहारा तालुक्याचा भ्रष्टाचारमुक्त विकास करण्यासाठी व विधिमंडळात जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी महाविकास आघाडीला विजयी करण्याचे आवाहन महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार



प्रवीण स्वामी यांनी दिले. गुरुवारी (ता.१४) रोजी सायंकाळी धाकटीवाडी, जगदाळवाडी, तलमोड आदी गावात नागरीकांशी संवाद साधला.

यावेळी शिवसेना नेते बाबा पाटील, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष विजय वाघमारे, जिल्हा युवक काँग्रेस चे अध्यक्ष आश्लेष मोरे, मा. जिप सदस्य प्रकाश आष्टे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार, सतीश जाधव, काँग्रेस विधी सेल चे एस पी इनामदार, ऍड इरफान जमादार, अमित रेड्डी, बाबा मस्के, जीवन सरपे, विजयकुमार नागणे, दादासाहेब गायकवाड,राष्ट्रवादीचे जगदीश सुरवसे, छावाचे बाळासाहेब माने आदी उपस्थित होते.

यावेळी धाकटीवाडी येथील हणमंत बोकले, प्रमोद बोकले, रावण सास्तुरे, धोंडिबा लंगडे, गोपाळ पाटील, गोविंद पाटील, नागनाथ गुंडूरे, भीम मनाळे, सतीश सास्तुरे, राम पटिल

जगदाळवाडी येथील सुधाकर जगदाळे, रावस जगदाळे,बाजीराव जगदाळे, ह.भ.प माणिक चव्हाण, पांडुरंग चव्हाण, मोहन भगत, माणिक चव्हाण, अजित मोरे, पद्माकर मोरे, कालिदास चव्हाण, बालाजी चव्हाण, दामाजी चव्हाण, मदन चव्हाण, फुलचंद जगदाळे, फुलचंद ठाकरे, जितू जगदाळे, अंकुश जगदाळे, रवींद्र लोंढे भानुदास चव्हाण. तलमोड येथील रमेश पाटील, महारुद्र स्वामी, शिवय्या स्वामी, प्रल्हाद मोरे, धोंडीराम पाटील, सुधाकर भोसले, अजय मंडले, महादेव मोरे, आकाश गोखले , गणेश पाटिल,बालाजी मोरे, हुजूर मुल्ला, निसार मसालगे, राजेंद्र सुगिरे, धोंडीराम गायकवाड, बालाजी मिसाले आदी उपस्थित होते.

# मतदानाविषयी जनजागृती; पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून साकारला महाराष्ट्राचा नकाशा





धाराशिव (माध्यम कक्ष):-येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.या निवडणुकीत जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघात मोठ्या संख्येने जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी मतदान जागृती कक्षाच्या (स्वीप) वतीने आज १४ नोव्हेंबर रोजी पोद्दार इंटरनॅशनल स्कूल,धाराशिव येथे मतदानाबाबत पोदारच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळीतून महाराष्ट्राचा नकाशा साकारला.

मतदानाविषयीच्या या जनजागृती कार्यक्रमाला जिल्हाधिकारी डॉ.सचिन

### जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांनी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना, नातेवाईकांना व शेजाऱ्यांना मतदान करण्याचे केले आवाहन

ओंबासे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाविषयी शपथ देऊन त्यांच्या पालकांना,नातेवाईकांना तसेच शेजाऱ्यांना जास्तीत जास्त संख्येने मतदान करायला जाण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके ,शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील,जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर,जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री.ढाकणे पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती रमय्या यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मतदान जनजागृती कार्यक्रमात विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# लोहारा तालुक्यातील मोघा खु.येथे ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा

लोहारा -लोहारा तालुक्यातील मोघा खु येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वैकुंठवासी हभप सद्गुरू वासकर महाराज, हभप शिवराम बुवा दिंडेगावकर,हभप संत शिरोमणी मारुती महाराज कानेगावकर यांच्या कृपा आशिर्वादाने ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व्यासपीठ हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज अचलबेट, काकडा, महापुजा , ज्ञानेश्वरी वाचन,गाथा भजन, भागवत कथा, हारीपाठ,हरि किर्तन,हारी जागर व सुगम संगीत गायन होणार असून दि १७ ते २३ नोव्हेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह सोहळा व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. दि १७ रोजी पहिला दिवस हभप नागेश सुर्यवंशी महाराज बिदर,१८ हभप धनराज महाराज रिंगणीकर,१९ हभप अर्जुन महाराज पळशीकर,२० हभप विठ्ठल महाराज दिवेगावकर,२१ हभप योगेश बप्पा झंगळे,२२ हभप महादेव स्वामी बोरी सलगर या नामवंत महाराजांचे रात्री ९ ते १२ या कालावधीत किर्तरूपी सेवा होणार आहे. तर २३ रोजी सकाळी काल्याचे किर्तन हभप नितीन महाराज जगताप यांचे व कालावाटप हभप ज्ञानेश्वर माऊली महाराज कानेगावकर यांच्या हस्ते करुन हभप भागवताचार्य गणेश सोनवणे महाराज यांच्या उपस्थितीत या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेची सागता तर पांडव प्रताप ग्रांथाची समाप्ती होणार असून भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन चोपदार विश्वनाथ मते, रमेश गोरे, लक्ष्मण भोंडवे,राजु पाटील, भरत





मते,राम मते, विश्वनाथ पाटील,अंगद भोंडवे, संभाजी तडोळे, शिवाजी भोंडवे, महादेव पाटील, योगेश गोरे आदी समस्त गावकरी मंडळ व हरिहर भजनी मंडळ मोघा खु याने केले आहे.

# पारा ग्रामपंचायत वर प्रशासक राज; विधानसभा निवडणुकी नंतर ग्रामपंचायतचे बिगुल वाजणार!

वाशी : वाशी तालुक्यातील पारा ग्रामपंचायतीची मुदत संपल्यामुळे पारा ग्रामपंचायत वर प्रशासक लागले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात निवडणुकीचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर लगेचच काही दिवसात पारा ग्रामपंचायत चे बिगुल वाजणार असल्याचे संकेत आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांसाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या तसेच वाशी तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायत पैकी एक असलेल्या पारा ग्रामपंचायतीची मुदत दि.३ नोव्हेंबर २०२४ रोजी संपली असल्याने त्याच दिवशीपासून वाशी तालुक्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका श्रीमती मुरकुटे के.डी.यांची प्रशासक म्हणून प्रशासनाने निवड केली आहे. ही निवड मुख्य कार्यकारी अधिकारी धाराशिव यांनी केली असून ही निवड निवडणूक होऊन ग्रामपंचायत अस्तित्वात येईपर्यंत असणार आहे. श्रीमती मुरकुटे यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे.

सध्या विधानसभेची रणधुमाळी सुरू आहे. त्याअनुषंगाने परांडा विधान सभेसाठीचे उमेदवार आपापल्या परीने पारा गावात सभा,बैठका घेत आहेत. पारा ग्रामपंचायतीसाठी इच्छुक उमेदवार विधानसभेचे उमेदवारांना आपापल्या परीने मदत करत आहेत. विधानसभेवर कोण निवडून जाणार आणि येणाऱ्या पारा ग्रामपंचायत निवडणुकीत यापैकी कोण कोण कोणत्या पॅनलला प्रचारासाठी मदत करणार? हे आपणाला भविष्यात समजेल.

# विधानसभेत पुन्हा घुमवूया आमदार ज्ञानराज चौगुले यांचा आवाज - प्रा. रविंद्र गायकवाड

उमरगा : उमरगा व लोहारा तालुक्याच्या विकासासाठी ज्ञानराज चौगुले चौथ्यांदा विधानसभा निवडणुकीत उतरले आहेत. सर्वसमान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी आमदार ज्ञानराज चौगुले यांना विजयी करा, विधानसभेत पुन्हा आमदार चौगुले यांचा आवाज घुमवूया, असे आवाहन मा.खासदार प्रा. रविंद्र गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी व्यासपीठावर आर. पी. आय.चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ ओव्हळ, माजी सभापती दिलीप



गौतम, माजी सरपंच विलास व्हटकर, प्रा शौकत पटेल, माजी सभापती हरीश डावरे,सरपंचपती अप्पू गुंजोटे ,उपसरपंच बाबा गायकवाड,चेअरमन बाबासाहेब श्रीहास उटगे, सोमशंकर पाटील, धनराज पाटील, विजयकुमार सोनकटाळे,राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष भीमा स्वामी, यांची प्रमुख उपस्थिती होती

उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार ज्ञानराज चौगुले यांच्या प्रचारार्थ येणेगुर येथे शुक्रवारी झालेल्या सभेत ते बोलत होते. महाराष्ट्र विरशैव सभा पुणे यांनी यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले यांना पाठिंबा दिला.

यावेळी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्याकडे विकासाची दूरदृष्टी आहे.देशात व राज्यात महायुतीची सत्ता आहे. या सत्तेच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी खेचून आणण्यासाठी मतदारसंघातील आमदार ही महायुतीचाच पाहिजे. राज्यात कोणीही उपाशी झोपणार नाही. प्रत्येकाला अन्न आणि निवारा देण्याचे वचन आम्ही देत आहोत. वृद्ध पेन्शनदार कामना योजना १५०० वरून २१०० रुपये देण्याचे वचन देणार आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ शिवसैनिक श्रीकांत मंगरुळे, ग्रामपंचायत सदस्य संदीप बिराजदार, राष्ट्रवादीचे युवा नेते अप्पू हिप्परगे , भाजपा तालुका सरचिटणीस सागर पाटील, भाजपा नेते मताफ तांबोळी, शेखर दादा स्वामी, तूगावचे संजय बिराजदार, शेखर पोफळे, शेषेराव पाटील ,नागेश पाटील, दत्ता हूळमुजगे आदींसह गावातील नागरिक व महायुतीचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परंडा विधानसभा मतदार संघातील राजकीय वातावरण ढवळले; जय हनुमान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुरेश कांबळे यांचा महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांना जाहिर पाठींबा



परंडा - जय हनुमान ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष सुरेश कांबळे यांनी परंडा विधान सभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांना जाहिर पाठींबा दिला आहे.

शनिवार दि१६नोव्हेंबर रोजी परंडा शहरातील प्रितम मंगल कार्यालय येथे सौ.उषाताई सुरेश कांबळे यांच्या मार्गदर्शना खाली जय हनुमान ग्रुपच्या कार्यकर्त्याचा संवाद व निर्धार मेळावा घेण्यात आला.

या निर्धार मेळाव्यासाठी उपस्थित हजारो कार्यकर्त्यांना जय हनुमान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुरेश कांबळे यांनी ऑनलाईन संवाद साधून

महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांना पाठींबा जाहिर करत ५० हजार मताची आघाडी देण्याचे कार्यकर्त्यांना अवाहन केले.या वेळी परंडा,भुम,वाशी, विधानसभा मतदार संघातील हजारो जय हनुमान ग्रुपचे कार्यकर्ते,माहिला उपस्थित होत्या.

यावेळी कार्यकर्त्याशी ऑनलाईन संवाद साधताना सुरेश कांबळे म्हणाले की मी ज्याच्यावर विश्वास ठेवला त्यांनी मला जानिवपुर्वक आडचणीत आनण्यात आले असल्याचे सांगीतले.तसेच पुढे बोलताना कांबळे म्हणाले की मी संकटात असताना स्व.ज्ञानेश्वर पाटील व राहूल मोटे यांनी मला साथ दिली मात्र मी ज्याच्यासाठी राजकारण,समाजकारण करत होतो त्यांनी मला खोटया गुन्हयात गुतवले आहे. त्यामुळे मी मागील १८ महिण्या पासून माझ्या कुठूबासून व सुमच्या पासून दुर आहे.

पुढे बोलताना कांबळे म्हणाले या संकट काळात मला स्व. ज्ञानेश्वर पाटील मला धिर देण्यासाठी भेट नार होते.मात्र काही कारणास्तव माझी त्यांच्याशी भेट झाली नाही. कालांतराने त्यांचे दुखःद निधन झाले.मात्र माझ्यावर ओढावलेल्या संकटा मुळे मला त्यांच्या कुठूंबाची भेट घेता आली नाही.पण मी आज तुमच्या साक्षीने स्व.ज्ञानेश्वर पाटील यांना शब्द देतोय मी मोठा भाऊ म्हणूण रणजित ज्ञानेश्वर पाटील यांना लाहाण भावा प्रमाने साथ देईन आसा शब्द देऊन महाविकास आघाडीचे उमेदवार राहूल मोटे यांना ५ हाजार मताच्या लोडने निवडून द्या असे अहवान कांबळे यांना जय

हानुमान ग्रुपच्या सदस्यांना केले

तसेच पुढे बोलताना कांबळे म्हणाले की माझ्या कार्यकत्यांना कोणी धक्का लावण्याचा, धमकावण्याचा प्रयत्न जर केला तर सुरेश कांबळे त्याला सोडणार नाही असा इशारा दिला आहे.

यावेळी वैशाली मोटे म्हणाल्या की जय हनुमान ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष सुरेश कांबळे यांनी महायुतीचे उमेदवार राहूल मोटे यांना पाठीबां दिल्याबद्द कांबळे यांचे अभिनंदन करुन आगामी काळात सुरेश भाऊच्या मदतीसाठी राहुल भैया मोटे सर्वात पुढे राहतील असे सांगुन मोटे यांना पाठींबा दिल्याबद्द सुरेश कांबळे व जय हनुमान ग्रुपच्या सदस्यांचे आभार मानले.

यावेळी सौ.उषाताई सुरेश कांबळे,प्रतिक कांबळे यांनी कांबळे कुठूंबावर ओढावलेल्या संकटाचा पाढा ग्रुपच्या सदस्यांना वाचून दाखवत सुरेश भाऊ कांबळे यांनी सांगीतल्या प्रमाने महाविकास आघाडीचे उमेदवार राहूल मोटे यांना येणाऱ्यां २० तारखेला मतदान करुन विजयी करा असे कार्यकर्त्यांना आवाहाण कले.यावेळी उषाताई कांबळे व प्रतिक कांबळे यांना गहिवरून आले होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोमनाथ देवकर सर यांनी केले तर आभार प्रतिक कांबळे यांनी मानले.

## विकसित महाराष्ट्रासाठी महायुतीचे स्थीर सरकार हवे-खासदार डॉ. भागवत कराड यांचे मत




धाराशिव - देशातील काही राज्यात काँग्रेसप्रणित सरकार होते. केवळ योजनांच्या घोषणा केल्या आणि प्रत्यक्षात जनता आणि राज्याच्या विकासासाठी काहीही न केल्याने जिथे जिथे काँग्रेसची सत्ता होती, तिथे भाजपाचे सरकार आले. २०१४ पासून भाजपाशासित स्थिर सरकारमुळे मोठ्या गतीने विकास झाला. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी देखील महायुतीचेच स्थिर सरकार हवे, त्याशिवाय विकासाला चालना मिळणार नाही, असे मत माजी केंद्रीय अर्थराज्य मंत्री खासदार डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केले.

माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी शुक्रवारी प्रतिष्ठान भवन येथे माध्यमांशी संवाद साधला. यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. मिलिंद पाटील, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, ॲड. खंडेराव चौरे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. कराड म्हणाले की, २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यात स्थिर सरकार होते. त्यावेळी कृषी, सिंचन, वीज, उद्योग, गुंतवणूक, रोजगार आदी क्षेत्रांच्या विकासासाठी भरघोस निधी देवून गतिमान महाराष्ट्रासाठी कामे करण्यात आली. जलयुक्त शिवारमुळे शेतशिवारात पाणी आले. नंतरच्या काळात जन-तेने भाजप आणि शिवसे-नेला कौल दिला होता. परंतु खर्चीसाठी उध्दव ठाकरे यांनी आपल्या हिंदूत्वाची व्याख्या बदलून काँग्रेस, राष्ट्रवादीशी हातमिळवणी केली आणि महाविकास आघाडीचे सरकार स्थापन केले. अडीच वर्षाच्या काळात केवळ जनहिताच्या आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या योजनांना त्यांनी स्थगिती दिली. त्यानंतर देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे महायुती सरकार आले. अडीच वर्षापेक्षा कमी काळात त्यांनी पुन्हा प्रगतशील महाराष्ट्र घडविण्यासाठी कामे केली. शेतकर्यांना एक रूपयात पीकविमा, जलयुक्त शिवार ३.०, लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्य योजना, उद्योजक निर्माण करण्यासाठी केंद्राच्या नवन-वीन योजनांची अंमलबजावणी करून महाराष्ट्राचा विकास करून दाखविला. अजून अनेक विकासकामे आणि प्रकल्प मार्गी लागणे बाकी आहे, त्यासाठी राज्यात स्थिर सरकार असणे आवश्यक आहे. जनतेने या बाबीचा विचार करून महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत येण्यासाठी आपले आशीर्वाद महायुतीला द्यावे, असे आवाहन माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. भागवत कराड यांनी केले.

## पं. जवाहरलाल नेहरू यांना जिल्हाधिकारी कार्यालय येथे अभिवादन



धाराशिव दि.१४,(जिमाका):-स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची जयंती आज १४ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी पं.जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी संतोष भोर, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे यांच्यासह अन्य अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.प्रतिमेस उपस्थितांनी अभिवादन केले.

## महाराष्ट्राने राज्यमातेचा दर्जा दिला त्याप्रमाणे केंद्र सरकारने गायीला राष्ट्रमातेचा दर्जा द्यावा-वैद्य नवनाथ दुधाळ





धाराशिव- जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी गो ध्वज स्थापना करण्यात आली. धाराशिव जिल्ह्यातील दुधाळवाडी येथील गोशाळेत देखील महाराष्ट्र राज्य प्रभारी तथा गोसेवक वैद्य नवनाथ दुधाळ यांनी गो ध्वजा-ची स्थापना करुन गोसंवर्धनाचा संदेश दिला.

यावेळी बोलताना वैद्य नवनाथ दुधाळ यांनी, गो ध्वज स्थापनेमागील उद्देश सांगितला. ते म्हणाले की, २२ सप्टेंबर २०२४ रोजी शंकराचार्य महाराजांनी गोमातेला राष्ट्रमाता घोषित करण्यासाठी आयोध्या धाम येथे रामकोटाची परिक्रमा करुन या यात्रेची सुरुवात केली. या ऐतिहासिक भारत यात्रेला भारतातील सर्व राज्यांमधून मोठा प्रतिसाद मिळाला. गोमाता वाचविण्यासाठी देशातील गोहत्या तात्काळ थांबली पाहिजे. पशुच्या श्रेणीमधून गोवंशाच्या श्रेणीत घेण्यात यावे, त्याचबरोबर गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा दिला पाहिजे. यात्रेला मिळा-लेला प्रतिसाद लक्षात घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिला, त्याचप्रमाणे दे-शाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा सदस्य आणि ४८ गोसांसद यांनी या मागणीला पाठिंबा दिलेला आहे. प्रधानमंत्र्यांना देखील या मागणीसाठी आमचा सदैव पाठींबा राहील, असेही ते म्हणाले. सर्व बांधवांनी गायीचा मुद्दा पुढे आणावा, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श सर्व जाती-धर्मातील लोकांनी घेऊन गोवंशाचे संवर्धन करावे. जगद्गुरु अविमुक्तेश्वरानंद महाराजांनी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात गोसांसद स्थापना केली असून राज्य प्रभारी या नात्याने आपण स्वतः महाराष्ट्रात गोध्-वज स्थापना करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासाठी अविमुक्तेश्वरानंद महाराज यांनी संपूर्ण महाराष्ट्रात गोसांसद पाठविलेले आहेत. संपूर्ण जिल्ह्यातील गोशाळांमध्ये गो ध्वज स्थापन करण्यात येत असून यामध्ये सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहनही श्री.दुधाळ यांनी केले. यावेळी गो माता राष्ट्रमाता, हर हर महादेव, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा गोसेवकांनी दिल्या.

## महागाई वाढवुन नागरीकांच्या जिवाशी खेळ करणाऱ्या सरकारला घरी बसवा - खासदार ओमराजे निंबाळकर



उमरगा : सरकारने महागाई वाढवुन नागरीकांच्या जिव-ाशी खेळ केला आहे. सध्याचे सरकार भ्रष्ट असुन जनतेच्या हितासाठी त्यांना सत्तेवरून खाली खेचणे आवश्यक आहे असे मत धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केले आहे.

उमरगा/लोहारा मतदारसंघाचे महाविकास आघाडी शिव-सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार श्री. प्रवीण विरभद्रया स्वामी यांच्या प्रचारार्थ शुकवारी (ता.१५) रोजी गुंजोटी येथे प्रचारसभा घेण्यात आली त्यावेळी खासदार निंबाळकर बोलत होते.

याप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बाबा पाटील, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे संजय पवार, उमरगा बाजार समितीचे सभापती रणधीर पवार, युवा नेते अजिंक्य पाटील, उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मोहियोद्दीन सुलतान शेठ, गा-वचे सरपंच कौशल्य बेळमकर, माजी सरपंच सरस्वती ताई कारे, उपसरपंच आयुब मुजावर, माजी सरपंच शिवाजीराव गायकवाड, अँड शितल चव्हाण सुधाकर पाटील उपस्थित होते.

पुढे बोलताना खासद-ार निंबाळकर यांनी उमरगा-लोहारा तालुक्यातील मतदारांनी सात रुपये देऊन सध्याच्या आमदाराला निवडून दिले. शिव-सेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी या आमदाराला तीनवेळा तिकीट देऊन निवडून आणलं परंतु या आमदारांनी उध्दव ठाकरे यांनाच मुख्यमंत्री पदाच्या खुर्चिवरून पायउतार करण्याच्या कटात सहभाग घेऊन उध्दव ठाकरे यांना खुर्चिवरून खाली खेचल. मतदारांच्या मताचा लिलाव करणाऱ्या आमदाराला खाली बसवुन महाविकास आघाडीला निवडून दया.

यावेळी गुंजोटी शाखा प्रमुख चन्नपा माळगे,ग्राम पंचायत सदस्य तथा युवा सेना शाखा प्रमुख योगेश शिंदे, श्रीनिवास हिरवे, सतीश कारे, महेशराज पाटील , प्रदीप पाटील, विक्रम गायकवाड, विजय शिंदे,बसवराज टोंपे, विजय स्वामी, राजेंद्र गायकवाड ,प्रभात शिंदे, नदीम मुजावर, हरून मुजा-वर, सद्दाम सुलतान,इम्रान मुजा-वर, मुकद्दर शेख,धनराज पाटील, दिलीप देशमुख बबन आयनले, दिलीप चौगुले,बाळासाहेब माळगे, उस्मान सय्यद, अमीर काझी, अँड कृष्णा पात्रे,, इम्रान मुजावर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी युवकांनी मोठ्या संख्येने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला यात इरफान मुजावर , जाफर मुजा-वर, समीर काझी, जमीर मुन्शी , अक्रम मुजावर , असिफ कारभारी , इरफान कारभारी ,सौदागर रुकमोद्दीन, इम्रान निजाम मुजावर यांचा प्रवेश झाला. ॲड एस.पी. इनामदार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी गुंजोटी व परिसरातील नागरीक मोठया संखेने उपस्थित होते.



## महिलांचा सन्मान राखणाऱ्या महायुती सरकारला समर्थन द्या

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या गावभेटी

धाराशिव - भाजपा महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर येणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत लाडकी बहीण योजनेची रक्कम दीड हजारावरून एकवीसशे होणार आहे. मुलींना मोफत शिक्षण, एसटी बसमध्ये सवलतीच्या दरात प्रवास, लखपती दीदी योजना, मोफत गॅस सिलेंडर, घरकुल योजना आणून सरकारने महिलांचा सन्मान केला आहे. या सरकारला बळ देण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठीशी मतदारांनी उभे रहावे, असे आ-वाहन जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांनी केले.

भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ गवळेवाडी, केमवाडी, गंजेवाडी येथे कॉर्नर बैठका, सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला. प्रत्येक ठिकाणी नागरिकांचा खास करून महिलांचा लाभणारा प्रतिसाद हा आत्मविशास वाढवणारा आहे. महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामांची माहिती उपस्थित ग्रामस्थांना दिली. खासकरून महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून जिल्ह्यासाठी महत्वाचे असलेले प्रकल्प अंतिम टप्यात आहेत. जिल्हा परिषदेच्या विविध योजनांमधून आपण या गावांसाठी भरपूर विकासनिधी उपलब्ध करून दिलेला आहे. तसेच केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री रोजगार हमी कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगार हमी कार्यक्रम या योजनेच्या माध्यमातून अनेक महिलांना व्यवसाय उभारणीसाठी मदत केली आहे. हा विकासाचा ओघ कायम ठेवण्यासाठी आपल्या आपल्या हक्काचे राणादादा आणि महायुती सरकार येणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच महायुतीला भरभरून समर्थन द्यावे, असे आवाहन केले.